जाहीर नोटीस

जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस व त्यांचे नियंत्रणाखाली येणा–या न्यायालयात खाली नमूद केलेप्रमाणे रद्दी विक्री करणेस उपलब्ध आहे. सदर रद्दी खरेदी करणेकरीता दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अ.क्र.	न्यायालयाचे नांव	उपलब्ध असलेली अंदाजे रद्दी
१	जिल्हा न्यायालय(अभिलेख कक्ष), सिंधुदुर्ग–ओरोस	५०० ते १००० किलो
२	दिवाणी न्यायालय (व.स्तर), सिंधुदुर्ग–ओरोस	५५ ते ६० किलो
३	मुख्यन्यायदंडाधिकारी न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस	१०० ते ११० किलो
४	दिवाणी न्यायालय(क.स्तर), सावंतवाडी	३० ते ४० किलो
५	दिवाणी न्यायालय(क.स्तर), कुडाळ	७० किलो
६	दिवाणी न्यायालय(क.स्तर), मालवण	६० किलो
७	दिवाणी न्यायालय(क.स्तर), कणकवली	३५ किलो
८	दिवाणी न्यायालय(क.स्तर), देवगड	५० ते ६० किलो

अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह , तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे नांवे असावे. सदर लखोटयावर **" रद्दी खरेदी करणेकरीता दरपत्रक"** असा उल्लेख करणेत यावा.

२) वर नमुद न्यायालयातील सर्व रद्दी संबंधित न्यायालयात जाऊन मोजून ताब्यात घ्यावयाची आहे.

३) ताब्यात घेतलेली रद्दी बांधणेसाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य स्वतः आणावयाचे असून रद्दी स्वखर्चाने नेणेची व्यवस्था करावयाची आहे. त्याकरीता येणारा वहातूक खर्च तसेच तत्संबंधी येणारा अन्य खर्च (हमाली, कर) संबंधितांनी सोसावयाचा आहे.

४) रद्दी ताब्यात घेतेवेळी रद्दीच्या खरेदीची रक्कम त्याचवेळी संबंधित न्यायालयांच्या कार्यालयामध्ये रोख स्वरुपात भरणा करावयाची आहे.

५) जाहीर नोटीसीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

६) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचा राहील.

तरी, इच्छुकांनी आपली दरपत्रके **दि.२६/०५/२०२६** पर्यंत या कार्यालयाकडे सादर करावीत.

दिनांकः- २०/०५/२०२६

प्र.सहाय्यक अधीक्षक(वित्त)
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

*****

म.जा.क्र.ग्रंथा./ ७५७७ सन २०२६
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस
दिनांकः-२०/०५/२०२६

प्रत माहितीसाठी व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी सविनय सादर-

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई-मेल द्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग-ओरोस (ई-मेल द्वारे)
७. मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस यांचे नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर

o/c